# समिती दर्पण

नोव्हेंबर-डिसेंबर २०२१

विद्यार्थी साहाय्यक समिती
दूरध्वनी - ०२० -२५५३३६३१, मोबाइल - ९४०४८५५५३०
ईमेल - info@samiti.org, वेबसाइट - www.samiti.org





## विश्वासार्हतेमुळेच जुळले समितीशी नाते

### विद्यार्थी साहाय्यक समितीच्या स्थापनादिनी झालेल्या स्नेहमेळाव्यात देणगीदारांची भावना

**पुणे :** दाता भवति वा न वा, असे एका संस्कृत सुभाषितात म्हटले आहे. मात्र या वचनाला छेद देणारा अनुभव नुकताच विद्यार्थी साहाय्यक समितीच्या एका कार्यक्रमात आला. दाता दुर्मिळ असतो, हे बरोबरच आहे, पण तो असतो... देण्याची इच्छा अनेकांना असते, मात्र ते दान सत्पात्री व्हावे, असे वाटते आणि त्याकरता हवा असतो विश्वास. हा विश्वासच विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाचा पाया असल्याने, अगदी शंभर रुपयांपासून, दोन- अडीच कोटी रुपयांपर्यंतची देणगी देणारे अनेक दाते या संस्थेला लाभले. या दात्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी विद्यार्थी साहाय्यक समितीच्या अच्युतराव आपटे वसतिगृहाच्या सभागृहात देणगीदार आणि हितचिंतकांचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. समितीच्या स्थापना दिनानिमित्त १३ नोव्हेंबर रोजी झालेल्या या मेळाव्यात अडीचशेहून अधिक देणगीदार आणि हितचिंतक सहभागी झाले होते. आपण दिलेल्या निधीचा सुयोग्य विनियोग होणार, याची खात्री असल्यानेच आम्ही या संस्थेला देणगी दिली आणि नंतर या संस्थेशी कायमचे जोडले गेलो, अशी भावना यावेळी देणगीदारांनी व्यक्त केली.


**समितीचे काम हे टिमवर्क : प्रतापराव पवार**

समाजाच्या विश्वासावरच समितीचे काम सुरू आहे. हे एक टिमवर्क आहे. देणगीदार, हितचिंतक आणि कार्यकर्त्यांच्या बळावरच ही संस्था उभी आहे, असे समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी यावेळी सांगितले. यावेळी काही निवडक देणगीदारांनी मनोगत व्यक्त केले.



**श्री. भाऊसाहेब जाधव : कार्याध्यक्ष, मराठवाडा मित्रमंडळ**

चांगल्या कामासाठी मदत करण्याची अनेकांची तयारी असते. पण आपण दिलेल्या पैशांचा योग्य विनियोग होईल, असा विश्वास आवश्यक असतो. तो विश्वास समितीच्या कामातून मिळाला. समितीची शिस्त, संस्कार यामुळे विद्यार्थी घडतात. येथे मिळालेले संस्कार त्यांना पुढे आयुष्यभर पुरतात. इतके की, समितीत राहिलेली मुलगी असेल, तर तिचे लग्नही लगेचच जुळते. ही समितीतील संस्कारांची महती आहे. त्यामुळेच मराठवाडा मित्रमंडळ ही संस्था समितीशी जोडली गेली. मराठवाडा मित्रमंडळाच्या वतीने समितीला अडीच कोटी रुपयांचा निधी देण्याचे जाहीर केले आहे. त्यापैकी एक कोटी रुपये देणगी स्वरुपात दिले आहेत.



**श्री. विनायक आणि सौ. किशोरी खंडकर**

सुमनताई करंदीकर यांच्यामुळे विद्यार्थी साहायक समितीचा परिचय झाला. माजी विद्यार्थीच व्यवस्थापन पाहतात, अशी ही एकमेव संस्था असावी. येथे विद्यार्थी- विद्यार्थिनींची केवळ राहण्या- जेवण्याची व्यवस्था होत नाही, तर संस्कारांचा ठेवाही त्यांना मिळतो. शिस्त,



स्वच्छता आणि स्वावलंबनाचे धडे त्यांना मिळतात. या वैशिष्ट्यांमुळे समितीशी जोडले गेलो. आमची मुले परदेशात आहेत, आमच्या गरजा कमी आहेत. आपल्याकडे जे आहे, त्यातील काही समाजाला द्यावे, ही इच्छा होती. देणगी देण्यासाठी ही उत्कृष्ट संस्था आहे. समितीला देणगी दिल्यानंतर, योग्य ठिकाणी दान दिल्याचे मानसिक समाधान मिळाले, मनाला उभारी मिळाली. हे समाधान लाखो रुपये खर्चूनही मिळाले नसते. त्यामुळे आम्हीच समितीचे आभार मानतो. समितीमुळे आज आम्ही समाधानी आणि सुदृढ जीवन जगतोय.



**सुप्रिया कुमठेकर**

ज्ञानप्रबोधिनीमधील आम्ही काही मैत्रिणी विद्यार्थी साहाय्यक समितीच्या सुमित्रा सदन या मुलींच्या वसतिगृहात मुलींशी गप्पा मारायला यायचो. त्यातून समितीच्या कामाची ओळख झाली आणि समितीशी कायमची जोडली गेले. दरवर्षी एक लाख याप्रमाणे गेली सलग तीन वर्ष समितीला देणगी दिली.



**प्रिया कोटस्थाने, सुभाष कोटस्थाने (संस्थापक, श्रीराम रबर प्रॉडक्ट) यांच्या**

प्रतिनिधी म्हणून उपस्थित. सुभाष कोटस्थाने हे गेल्या २० वर्षांपासून समितीशी जोडले गेलेले आहेत. कोटस्थाने यांना आपल्या विद्यार्थीदशेत अनेक अडचणींचा सामना करावा लागला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरात शिक्षण घेताना कोणत्या दिव्यातून जावे लागते, याची जाणीव त्यांना आहे. समिती अशाच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्नशील असते. त्यामुळे कोटस्थाने यांनी समितीशी नाते जोडले. वडिलांप्रमाणेच आम्ही त्यांच्या दोघी मुलीही हे नाते टिकवून ठेवू.

**नीता गुळवणी**

माझे दिर डॉ. शिरीष गुळवणी हे समितीच्या विद्यार्थी पालकत्व योजनेत सहभागी होते. त्यामुळे समितीतील मुले घरी येत. या मुलांची शिस्त आणि संस्कार पाहून समितीविषयी कुतूहल वाटले. रिमांड होममधील मुलांसाठी काम करत असताना, त्यातील होतकरू मुलांना नंतर समितीत प्रवेश मिळाला, तर त्यांच्या भरकटलेल्या आयुष्याला निश्चितच



चांगला आकार मिळेल, असे वाटले. त्यातून त्यांच्या प्रवेशासाठी प्रयत्न केले. या मुलांना येथे प्रवेश मिळाला. त्यांच्या खर्चाचा भार कॉग्निझंट कंपनीने उचलला. समितीच्या कामाने प्रभावित होऊन त्या कंपनीने समितीला शंभर संगणक देणगी स्वरुपात दिले.



**प्रकाश आपटे (सिंजेंटा फाउंडेशनचे अध्यक्ष)**

तांबोळीसरांमुळे समितीची ओळख झाली. इथली स्वच्छता, शिस्त, टापटीप भावली. वसतिगृहात राहून गेलेले विद्यार्थी जीवनात यशस्वी झाल्यानंतर पुन्हा समितीच्या कामात सहभागी होतात, हीच समितीच्या कामाची मोठी पावती आहे. कमवा- शिका योजनेतून विद्यार्थ्यांना स्वावलंबनाची प्रेरणा मिळते. घरी राहून जे विद्यार्थ्यांना शिकता येणार नाही किंवा जे संस्कार त्यांच्यावर होणार नाहीत, ते समितीत त्यांना मिळतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. समितीच्या या वैशिष्ट्यांमुळे समितीशी घट्ट नाते जोडले गेले.



**राहुल लाळे (व्हाईस प्रेसिडेंट, भारत फोर्ज)**

कंपनीच्या सीएसआरमुळे समितीच्या संपर्कात आलो. येथे विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी प्रयत्न केला जातो. उद्योजकतेचे धडे त्यांना दिले जातात. येथील अनेक विद्यार्थिनींचे मेंटॉर म्हणून काम करण्याची संधी मिळाली.

**रंगली गाण्यांची मैफल :** स्नेहमेळाव्याच्या उत्तरार्धात जितेंद्र अभ्यंकर आणि वर्षा भिडे यांचा गाता रहे मेरा दिल... हा मराठी- हिंदी गीतांचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या शीर्षकगीताने सुरू झालेल्या या मैफलीत नीले गगन के तले, पाहिले न मी तुला, जीवलगा कधी रे येशील तू... अशी गाजलेल्या हिंदी- मराठी गीतांनी रंगत आणली. उपस्थितांनीही काही गाण्यांना वन्स मोअर देत दाद दिली. मेळाव्याचे सूत्रसंचालन सुप्रिया केळवकर यांनी केले.

**समितीविषयी...**

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पाहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्चशिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्यसेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरवात झाली. पुढे त्यांच्या निवासाचा प्रश्न मार्गी लावला. मग विद्यार्थिनींसाठी सोय करण्यात आली. आज समितीची पुण्यात पाच वसतिगृहे आहे. त्यात ७५० विद्यार्थी- विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रम समितीमार्फत राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

**आठवणींचे पान...**

## घासातला घास... एक अनमोल दान!

**तुकाराम गायकवाड,**
कार्यकारी विश्वस्त, विद्यार्थी साहाय्यक समिती

विद्यार्थी म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वसतिगृहात राहात असताना कमवा- शिका उपक्रमांतर्गत साहाय्य संकलन विभागात मी काम करत होतो. दरमहा साहाय्यदात्यांच्या घरी जाऊन सहाय्य जमा करण्याचे काम होते. त्यापैकी एक देणगी माझ्या मनात कायमची कोरली गेली...

सदाशिव पेठेत खजिना विहीर परिसरात एक साहाय्यदाते होते. (नावाचा उल्लेख मुद्दाम टाळत आहे) त्यांचा मेसचा व्यवसाय होता. घरची परिस्थिती अगदी जेमतेम. घरही जुन्या पद्धतीचे. मी साहाय्य घ्यायला गेल्यावर माझ्या मनात कायम एक प्रश्न यायचा... अशा परिस्थितीतही यांना समितीला मदत कशी करावीशी वाटते?

मी दर महिन्याला सहाय्य्य घ्यायला त्यांच्या घरी जायचो. त्या मावशी आस्थेने चौकशी करून एका पितळी डब्यात ठेवलेली ती रक्कम माझ्या हाती देत असत. दरवेळी त्यांचा आग्रह एकच असायचा, की १० तारखेच्या आत येत जा. हे पैसे तेवढ्यासाठी बाजूला काढून ठेवलेले असतात. त्यानंतर घरखर्चासाठी ही रक्कम खर्च झाली तर तुला मोकळ्या हाताने पाठवावे लागेल.

मी इतरही साहाय्य गोळा करायचो, पण ही रक्कम हातात घेतल्यावर मला वेगळेच समाधान वाटायचे. समितीविषयी सामान्य लोकांच्या मनातही किती आदर आणि आस्था आहे, याचे हे मूर्तिमंत उदाहरण होते. आपल्या जेमतेम उत्पन्नातील थोडा भाग गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खर्च करण्यामागची त्यांची भावना मला आजही खूप मोलाची वाटते.

**मनोगत**

## परिसस्पर्श



आयुष्यातील पहिल्या अठरा वर्षांत गावाबाहेरचे जग न पाहिलेली मी, अचानकच शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुणे या चमचमत्या नगरात प्रवेश केला. जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास सारे काही असतानाही आयुष्यात पहिल्यांदाच खचल्यासारखे वाटले. फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश मिळाला होता, पण राहण्याची सोय होत नव्हती. त्यामुळे प्रवेश रद्द करण्याचीच वेळ आली होती. त्याच दरम्यान एका सिनियर विद्यार्थ्याकडून विद्यार्थी साहाय्यक समितीविषयी माहिती मिळाली आणि बुडत्याला आधार मिळावा, अशी माझी स्थिती झाली. काळोखात आशेचा किरण दिसला. मला समितीत प्रवेश मिळाला.

समितीमुळेच मला चांगल्या मैत्रिणी मिळाल्या. योगापासून कमवा- शिकापर्यंत सर्व उपक्रमांमध्ये मी सहभागी झाले. अभ्यासाबरोबरच येथे या उपक्रमांमध्येही मन रमले. पोस्टर कॉम्पिटिशन, उमंग फेस्टिव्हल, कथाकथन अशा वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये आवडीने भाग घेतला.

घरी आर्थिक अडचण होती. सुरुवातीला पैशांची व्यवस्था झाली. पण दुसऱ्या सेमिस्टरला पैशांची अडचण होती. त्यावेळी समितीने एका शिष्यवृत्तीसाठी माझी शिफारस केली. मला शिष्यवृत्ती मिळाली आणि माझ्या शिक्षणातील आर्थिक अडसर दूर झाला. विद्यार्थी साहाय्यक समिती कशा प्रकारे विद्यार्थ्यांना सहाय्य करते, याचा चांगला आणि अविस्मरणीय अनुभव मला आला.

कोरोना काळातही समितीने आम्हाला मदत केली. सर्व काही बंद असताना, कमवा- शिका अंतर्गत वृक्षलागवडसारखा उपक्रम सुरू केला. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष झाडे लावण्यास प्रोत्साहन देत पर्यावरण रक्षणाची जाणीव करून दिली आणि त्याचबरोबर काही प्रमाणात आर्थिक लाभही मिळवून दिला. कोरोना काळात पाहुणे योजनेअंतर्गत आम्हा मुलींची राहण्याची व्यवस्था केली.

समिती एक संस्था नसून कुटुंब आहे, जी सर्वांना जोडते आणि अखेरपर्यंत हे नाते टिकवून ठेवायला भाग पाडते. समिती हा परिस आहे, जो विद्यार्थ्यांचे आयुष्य सोन्यासारखे घडवते. समितीने आजवर जे दिले आणि देत आहे, याबद्दल मी समितीची आजन्म ऋणी राहिन.

**सना जावेद इनामदार,** तृतीय वर्ष. विज्ञान,
फर्ग्युसन महाविद्यालय. डॉ. अच्युतराव आपटे वसतिगृह



## शिंपल्यातील मोती

सन २००६ ते २००९ या काळात समितीमध्ये वास्तव्य असलेल्या सुरेखा भणगे- शिंदे यांची नुकतीच माथेरान गिरीस्थानच्या मुख्याधिकारीपदी नियुक्ती झाली आहे. त्यापूर्वी त्यांची पहिली नेमणूक खालापूर नगरपंचायतीच्या मुख्याधिकारीपदी झाली होती. अवघ्या १७ महिन्यांच्या कार्यकाळात खालापुरात स्वच्छता अभियान यशस्वी करण्याबरोबर तेथील आदिवासी वाडीत पिण्याच्या पाण्याची योजना राबवत महिलांची कित्येक वर्षांची पायपीट त्यांनी थांबविली. त्यांच्या तेथील कामाची पावती म्हणजे ग्रामस्थांबरोबरच पत्रकार आणि लोकप्रतिनिधींनी केलेला त्यांचा निरोप समारंभ. क्वचित एखाद्या सरकारी अधिकाऱ्याच्या वाट्याला असा कौतुकाचा सोहळा येतो.

# समितीतील वास्तव्यात मिळाली विचारांना दिशा



**सुरेखा भणगे-शिंदे**

विद्यार्थी साहाय्यक समितीबद्दल बोलण्यासारखे व लिहिण्यासारखे खूप आहे. प्रथमपासून मी समाजवादाकडे झुकलेली असल्यामुळे, या संस्थेतील वास्तव्यात खूप गोष्टी शिकले, ज्याचा उपयोग मला शासकीय सेवेत काम करताना, परिसराचा सर्वांगिण विकास करताना, वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी झाला. ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांच्या जीवनात दीपस्तंभाची भूमिका समितीची आहे. आज माझ्यासारखे सामान्य, कष्टकरी कुटुंबातील हजारो ग्रामीण विद्यार्थी स्वतःच्या पायावर व समितीने घालून दिलेल्या नैतिक आधारावर जीवनातील सर्वच क्षेत्रात यशस्वीपणे काम करताना दिसतात.

समितीमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासावर भर दिला जातो. आरोग्य निरोगी राहण्यासाठी योगासने, प्राणायाम, सकाळी व्यायाम केल्यावर पेलाभर दूध, जेवणात कडधान्ये, हिरव्या भाज्या... त्यामुळे समिती म्हणजे दुसरे घरच वाटे. विद्यार्थी विकास केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. गटचर्चा, विविध स्पर्धा, ट्रेकिंग, अभ्यास शिबिरे आणि विध्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरणाऱ्या विविध मान्यवरांशी संवाद... त्यामुळे एक चांगला आणि चौफेर माहिती आलेला विद्यार्थी या वास्तूत घडतो.

माझा वैयक्तिक अनुभव नितांतसुंदर. मला समितीचे कौतुक करायला नेमके शब्द सापडत नाहीत. बारावीनंतर मी प्रथम शहरात आले. माझे मामा बाबासाहेब सूर्यवंशी हे समितीचे माजी विद्यार्थी असल्यामुळे समितीची आणि येथील नियमांची थोडीशी माहिती होती. बी.ए.साठी वडिया कॉलेजमध्ये मेरिटवर नंबर लागल्यावर, एक महिन्यात समितीत प्रवेश मिळाला आणि माझ्या कच्च्या मातीच्या गोळ्याला आकार यायला सुरुवात झाली. हुशार असले तरी ग्रामीण भागातून आल्यामुळे थोडासा बुजरा स्वभाव होता, हळूहळू तो आत्मविश्वासात परिवर्तित होत गेला. समितीतील वास्तव्यात खूप गोष्टी शिकले, ज्याच्या पायावर आज लोकसेवेत सक्षमपणे कार्यभार पेलते आहे. कामे करताना सामान्य, कष्टकरी वर्गावर कधीही अन्याय होणार नाही, याची दक्षता घेते. कोणत्याही गोष्टीकडे उघड्या डोळ्यांनी पाहण्याची दृष्टी समितीने दिली. याच शिदोरीवर पुढील वाटचाल सुरू आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी लागावी म्हणून समितीच्या प्रत्येक हॉस्टेलमधील अभ्यासिकेत सर्व प्रकारची पुस्तके, वर्तमानपत्रे असतात. खूप विचारपूर्वक, विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून, ग्रामीण मुलांच्या आर्थिक बाबीकडे लक्ष देऊन, मोफत आणि सर्व सुविधांनी युक्त अशी अभ्यसिका उपलब्ध करून दिल्याने माझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांना याचा प्रत्यक्ष लाभ मिळाला. फक्त स्पर्धा परीक्षा पास होणे महत्त्वाचे नाही. आपण प्रत्यक्षात समाजात जाऊन ग्राउंड लेव्हलवर काम करतो तेव्हा नक्कीच आपल्यामागे कुठले तरी संस्कार, विचार असतात. मला कायमच समाजवादाने भुरळ घातली आणि समितीतील वास्तव्याने त्यात आणखीच भर घातली, यात शंका नाही. समितीच्या विचारांशी माझे नाते कायम असेल. समाजासाठी काम करण्याची मला मिळालेली संधी, मी कायमच सार्थ ठरवेन.

## समिती वृत्त

**विद्यार्थी साहाय्यक समितीने कायमच काळाबरोबर राहण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानुसार कार्यपद्धतीत अनेक बदलही वेळोवेळी केले आहेत. सध्याचे जग हे डिजीटल आणि ऑनलाइनचे आहे. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे लागू झालेल्या लॉकडाऊनच्या काळात तर या दोन्ही गोष्टींचे महत्त्व अधोरेखित झाले. त्यामुळे समितीनेही या नवीन जीवनशैलीचा अंगिकार करण्याचा निर्णय घेत काही बदल करण्यास सुरुवात केली आहे.**



### व्हिडीओ कॉन्फरसिंग

एखाद्या कार्यक्रमाला किंवा बैठकीला एकाच वेळी सर्व वसतिगृहातील मुलांना सहभागी होता यावे, यासाठी व्हिडीओ कॉन्फरसिंगची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. अच्युतराव आपटे वसतिगृहात ही यंत्रणा नुकतीच सुरू झाली असून लवकरच सुमित्रा सदन, लाला लजपतराय भवन या वसतिगृहांमध्येही ही सुविधा उपलब्ध होणार आहे. या यंत्रणेसाठी डेलवाल फ्लो कंट्रोल्स प्रा. लि. या कंपनीचे अर्थसाह्य लाभले आहे.



### कागदपत्रांचे डिजिटायझेशन

समितीच्या स्थापनेपासून आतापर्यंतच्या सर्व कागदपत्रांचे डिजीटायझेशन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कामास सुरुवात झाली असून, सुमारे ५० हजार कागदपत्रे डिजीटल स्वरुपात उपलब्ध होणार आहेत. पुण्यातील मॉड्युलर इन्फोटेक ही कंपनी यासाठी सहकार्य करत आहे.

### संकेतस्थळ अद्ययावत

विद्यार्थी साहाय्यक समितीचे संकेतस्थळ (www.samiti.org) अद्ययावत करण्यात आले आहे. समितीची स्थापनेपासूनची माहिती तसेच सर्व उपक्रमांची माहिती या संकेतस्थळावर आहे. या पुढील काळात राबविण्यात येणारे उपक्रम, वेळोवेळी होणारे कार्यक्रम यांची माहितीही या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

### आता प्रवेशही ऑनलाइन

याशिवाय यापुढे समितीच्या सर्व वसतिगृहांत विद्यार्थ्यांचे प्रवेशही ऑनलाइन स्वरुपात होतील. विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावर जाऊन तेथील प्रवेश अर्ज ऑनलाइन भरायचा आहे. त्या अर्जातील माहिती पडताळून पाहिली जाईल आणि प्रवेशास पात्र असलेल्या विद्यार्थ्याला थेट मुलाखतीसाठी बोलावले जाईल. त्यातून प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता राहिल आणि विद्यार्थी-पालकांचे हेलपाटे कमी झाल्याने त्यांचा वेळ आणि पैसे वाचतील.

### वसतिगृहांमधील स्वच्छतागृहांची दुरुस्ती

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वसतिगृहांच्या इमारतींचे वय किमान १५ ते कमाल ५५ वर्षांपर्यंत आहे. त्यामुळे स्वाभाविकच देखभाल- दुरुस्तीची किरकोळ कामे कायमच करावी लागत होती. वसतिगृहात विद्यार्थी असताना मोठी कामे करणे शक्य नव्हते. मात्र गेल्यावर्षी लॉकडाऊनमुळे महाविद्यालये बंद झाली. त्यामुळे विद्यार्थी- विद्यार्थिनी आपापल्या घरी गेले. या संधीचा फायदा घेत मोठ्या दुरुस्तीचे काम हाती घेतले. पाचही वसतिगृहांतील स्वच्छतागृहांची दुरुस्ती सुरू आहे. यासाठी सुमारे सव्वा कोटी रुपये खर्च अपेक्षित असून हे काम लवकरच पूर्ण होईल.

### आत्मजा फाऊंडेशनकडून देणगी

मुलींसाठी उभारण्यात येणाऱ्या या वसतिगृहासाठी समाजातून दानशूरांकडून मदत मिळत आहे. आत्मजा फाऊंडेशनच्या वतीने दोन कोटी रुपयांची देणगी जाहीर झाली असून त्यापैकी ५० लाख रुपयांचा धनादेश फाऊंडेशनने नुकताच समितीकडे सुपूर्त केला.



### समितीच्या कार्यप्रणालीचे कौतुक


राज्याचे शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी यांनी काही दिवसांपूर्वी समितीला भेट दिली. समितीच्या पदाधिकाऱ्यांशी त्यांनी संवाद साधला. समितीतील शिस्त, कामाची पद्धत पाहून ते भारावून गेले. सरकारी वसतिगृहांना शिस्त लावण्यासाठी आणि तेथील कामात सुसूत्रता आणण्यासाठी समितीच्या कार्यप्रणालीचा तेथे अवलंब करण्याचा त्यांचा विचार असून त्या दृष्टीने आराखडा तयार करण्यास सुरुवात झाली आहे.

### वार्षिक दिनदर्शिका




विद्यार्थी साहाय्यक समितीची गेल्यावर्षीप्रमाणेच यंदाही नवीन वर्षाची वार्षिक दिनदर्शिका (कॅलेंडर) प्रकाशित करण्यात येणार आहे. यात इंग्रजी महिने, तारखा, मराठी महिने, तिथी, सणवार, महत्त्वाच्या व्यक्तींचे वाढदिवस, जयंती, पुण्यतिथी याबरोबर मागील पानांवर समितीच्या विविध उपक्रमांची माहिती वाचायला मिळणार आहे. या दिनदर्शिकेच्या ग्लेझ्ड पेपरवर तीन हजार प्रती छापण्यात येणार असून त्याचा खर्च जाहिरातींच्या उत्पन्नामधून करण्यात येणार आहे. समितीचे साहाय्यदाते, समितीशी संबंधित सर्व घटक आणि माजी व आजी विद्यार्थी यांना ही दिनदर्शिका भेट स्वरुपात देण्यात येणार आहे.

## ...आणि त्यांनीही केले यशोशिखर काबीज!



**एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ, याचा शब्दशः प्रत्यय समितीच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत आलेला दिसतो. ग्रामीण भागातून शहरी भागात शिक्षणासाठी आल्याने आत्मविश्वास कमी झालेल्या आणि त्यामुळे अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना समितीतील त्यांच्या मित्रांनी अभ्यासात मदत केली आणि स्वतःबरोबर त्यांनाही यशोशिखरावर नेले.**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरी भागातील अनेक गोष्टींचे प्रचंड कुतूहल असते. खूप काही करून दाखवण्याची जिद्द त्यांच्या मनामध्ये असते आणि त्यासाठी वाट्टेल ते कष्ट करण्याची त्यांची तयारी असते. गावाकडे त्यांनी राजकारणी व शासकीय अधिकाऱ्यांना श्रीमंत व प्रतिष्ठित होताना पाहिलेले असते. त्यामुळे त्यांचा ओढा शासनामध्ये प्रशासकीय अधिकारी होण्याकडे जास्त असतो. उत्तम पदवी घेणे, विविध स्पर्धा परीक्षांना सामोरे जाणे व उत्तम संधी घेत राहणे, याकडे त्यांचा विशेष कल असतो.

**गावातील, घरातील वातावरणाचा प्रभाव**

प्रवेश व शिष्यवृत्ती प्रक्रियेत मुलांच्या मुलाखती घेताना अनेक गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. काही विद्यार्थ्यांना स्वतःला कसे प्रेझेंट करायचे, याचे चांगले चातुर्य असते, तर काही विद्यार्थी याउलट स्वतःकडे उत्तम क्षमता असूनही त्याचे सादरीकरण करू शकत नाहीत. स्वतःला असलेली गरज योग्य शब्दांत मांडण्याचे चातुर्य त्यांच्याकडे नसते. गावाकडील आणि घरातील काही संस्कार नकळत त्यांच्या मनात दृढ झालेले असतात, त्यामध्ये अगदी सहजगत्या छोट्या छोट्या गोष्टींमध्ये नकळत खोटे बोलणे, अनावश्यक पद्धतीने गोष्टी लपवणे, अधिकचा लाभ घेण्याची इच्छा असणे, विनासायास अधिक गोष्टी मिळविण्याचा प्रयत्न करणे, अशा गोष्टी त्यांच्याकडून घडतात. तर काहींच्या बाबतीत या उलट अगदी निखळ, साधे, सोपे, स्वच्छ, सरळ रेषेत सत्यवादी राहणे स्वतःला स्वकष्टातून सिद्ध करणे, असेही संस्कार झालेले जाणवतात. खरे तर या सगळ्या गोष्टी हे विद्यार्थी कोणत्या परिस्थितीतून व वातावरणातून आले आहेत, यावर अवलंबून असते.

**समितीच्या उपक्रमांतून आयुष्याला दिशा**

समितीत प्रवेश घेतल्यानंतर विशेषतः दोन- तीन वर्षांच्या समितीमधील वास्तव्यानंतर समितीतील विद्यार्थी विकास केंद्राच्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून तसेच पाल्य पालक योजना, कमवा व शिका, चार तास काम, योगासने अशा उपक्रमांद्वारे होणाऱ्या संस्कारांतून विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळते व उत्तम व्यक्तिमत्व आकार घेऊ लागते की जे कोणत्याही परिस्थितीस संघर्ष करून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करू शकते. हे समितीतून यशस्वीपणे बाहेर पडलेल्या अनेक विद्यार्थ्यांच्या माध्यमातून प्रकर्षाने जाणवते. यामध्ये अनेक विद्यार्थ्यांची उदाहरणे देता येऊ शकतील. मला आठवते, सन २००९- १० दरम्यान समितीत अकरावीचे २५ विद्यार्थी व जवळपास १५ ते २० विद्यार्थिनींना प्रवेश दिला होता. गावाकडे प्रतिकूल परिस्थितीत अभ्यास करून अत्यंत उत्तम गुण मिळवून फर्ग्युसन महाविद्यालय, आपटे प्रशाला, गरवारे महाविद्यालय अशा उत्तम महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेऊनसुद्धा बारावीत त्यांना तुलनेत फारच कमी गुण मिळाले. आपण विद्यार्थ्यांना एवढ्या चांगल्या सुविधा देत असतानाही अशी परिस्थिती का, यावर त्यावेळी अनेकदा चर्चा झाली.

याच काळात विद्यार्थ्यांच्या मदतीने एक प्रयोग हाती घेतला. त्यामध्ये या विद्यार्थ्यांमधील मॅथमॅटिक्स, फिजिक्स, केमिस्ट्री या विषयांची आवड असणारे दोन-दोन हुशार विद्यार्थी निवडले. संध्याकाळी जेवणानंतर अभ्यासाला बसण्यापूर्वी ४० ते ४५ मिनिटे सर्वांनी एकत्र यायचे. त्या निवडलेल्या दोन हुशार विद्यार्थ्यांनी इतर सर्व विद्यार्थ्यांच्या संबंधित विषयातील अडचणी/ प्रश्न सोडवायचे. आपण हा विषय कशा प्रकारे, कोणत्या टेक्निकच्या आधारे समजून घेतला, यावर इतर विद्यार्थ्यांशी चर्चा करायची. अशा प्रकारे प्रत्येक विषयासाठी आठवड्यातील एक दिवस ठरवून देण्यात आला.

**अनेक विद्यार्थ्यांना फायदा**

या प्रयोगाचा उत्तम फायदा अनेक विद्यार्थ्यांना झाला. पुढे बारावीच्या परीक्षेत देखील त्यांच्या गुणवत्तेत प्रगती दिसून आली. यातीलच एक विद्यार्थी दीपक गाडेकर आज भारत सरकारच्या नाबार्डमध्ये डेहराडून येथे ग्रेड ए अधिकारी म्हणून कार्यरत आहे. त्याच कालावधीतील निखिल कवडे, भूषण जाधव हे दोघे यूपीएससीअंतर्गत केंद्रीय सशस्त्र पोलीस बल (CAPF) ग्रुप A मध्ये डीवायएसपी (DYSP) म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्याच बरोबरीचे अक्षय बागल व अक्षय पाचरणे हे विद्यार्थी बंगळूर, मुंबई येथे Co-operate Investment Banking येथे स्पेशालिस्ट सॉफ्टवेअर इंजिनियर म्हणून उत्तम भूमिका बजावत आहेत. अशी अनेक यशस्वी उदाहरणे देता येतील.

– **तुषार रंजनकर,** विश्वस्त, विद्यार्थी साहाय्यक समिती

## वळून पाहताना...

# न पाहिलेले पालक



विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये सन २०००-२००३ दरम्यान राहात होते. समितीच्या पालकत्व योजनेनुसार बीएमसीसी रोडवर राहणारे उमेश गजानन नवाथे हे माझे पालक होते. पण ते स्वतः मला कधीच भेटले नाहीत. कारण ते परदेशात होते. समितीच्या नियमाप्रमाणे मी प्रत्येक महिन्याला त्यांच्या घरी जायचे आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीला भेटून यायचे.

कॉलेज शिक्षण संपल्यानंतर मी समितीमधून बाहेर पडले, पण तीन वर्षांत पालकांना भेटता न आल्याची खंत होती. मी ही गोष्ट चंद्रकांत कुलकर्णीसरांना सांगितली आणि पालकांचा फोन नंबर मागितला. सरांनी अजिबात वेळ न घालवता त्यांचा पत्ता शोधला आणि तेथे जाऊन आले. मग आम्हाला समजले, की माझे पालक कॅनडामध्ये स्थायिक झाले आहेत. पण त्यांचा ई- मेल आयडी मिळाला. फेब्रुवारी २०२१ मध्ये मी त्यांना मेल पाठवला. त्यामध्ये त्यांनी केलेल्या मदतीमुळे मी माझे शिक्षण पूर्ण करू शकले, याबद्दल त्यांचे आभार मानले आणि आपण कधीच भेटू शकलो नाही, याबद्दल खंत व्यक्त केली. दोन दिवसांनंतर त्यांचा मला रिप्लाय आला. माझ्या आयुष्यातील तो खूप आनंदाचा क्षण होता. त्यावेळी मला जे वाटले, ते शब्दांत व्यक्त करता येणार नाही. त्यांनी मी मेल पाठविल्याबद्दल आनंद व्यक्त केला आणि माझा फोन नंबर, वैयक्तिक माहिती विचारली. भारतात आल्यावर तुला नक्की कळवू, असे आश्वासन दिले.

– **कविता विशाल कोरडे**

(पूर्वीची कविता गावडे, माजी विद्यार्थिनी)